## प्रेसनोट दि.१६/१०/२०१८

## स्वारगेट पोलीस स्टेशन कडील चांगली कामगिरी

दि. १६/१०/२०१८ रोजी सकाळी ०९.३० वा.पोलीस निरीक्षक श्री मच्छिंद्र पंडीत, सहा. पोलीस निरीक्षक एस.एन.शेख, पो. शि.१०२०८ शिवाजी सरक,पो. शि. ८७४३ बाबासाहेब शिंदे असे पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर हजर असताना तामीळनाडुचे (चेन्नई) श्रीनिवासन व त्यांची पत्नी सकाळी ०८.३० वा. चे सुमारास श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेवुन रिक्शातुन सारसबाग चौपाटी येथे ०९.०० वा. उतरले.रिक्षातुन उतरताना श्रीनिवासन यांच्या पत्नीची पर्स रिक्शात विसरुन राहिली त्यामध्ये रोख रुपये १०,०००/- व मोबाईल होता, अशी तक्रार स्वारगेट पो.स्टे.येथे देताच पोलीस निरीक्षक मच्छिंद्र पंडीत, सहा.पोलीस निरीक्षक एस.एन.शेख यांनी सीसीटीव्हि कॅमेराच्या माध्यमातुन रिक्शाचा नंबर प्राप्त करुन,रिक्षा क्र.एम.एच. १२, आर.ए. ८०८३ असल्याचे खात्री झालेने त्या वरील चालकाचा नाव व पत्ता शोधले असता सदर रिक्षा ड्रायव्हर दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे जावुन सदरची पर्स रिक्षात विसरले असलेबाबत सांगुन जमा करत असलेबाबत माहिती मिळालेने पोलीस निरीक्षक श्री मच्छिंद्र पंडीत, यांनी बिट मार्शल पो. शि.१०२०८ शिवाजी सरक,पो. शि. ८७४३ बाबासाहेब शिंदे यांना लागलीच दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे पाठवुन सदर रिक्षा ड्रायव्हर यास स्वारगेट पोलीस स्टेशन येथुन घेवुन आले रिक्षा ड्रायव्हर यांना आपले नांव विचारले असता त्यांनी आपले नांव श्री तानाजी पवार असल्याचे सांगुन त्यांनी प्रामाणिकपणे रिक्शात विसरलेली पर्स त्यामध्ये रक्कम रुपये १०,०००/- व मोबाईलसह श्रीनिवासन व त्यांची पत्नी यांना आमचेसमक्ष दिले.त्याबददल श्रीनिवासन व त्यांच्या पत्नीने पोलीसांचे व रिक्षा ड्रायव्हर यांचे आभार मानुन समाधान व्यक्त केले तसेच मा. माजी जिल्हाधिकारी श्री प्रभाकर देशमुख व त्यांची पत्नी सौ. अनुराधा देशमुख पुणे यांनीही पोलीसांचे व रिक्षा ड्रायव्हरचे कौतुक केले आहेत.

